cmyk

# ही घ्या मटका लिहिणाऱ्यांच्या पत्ता असलेली यादी

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
आरंभ
संपादक : दिपक थोरात Mob.9860898564



■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष – ०२ ■ अंक – २३४ ■ मंगळवार दि.१३ मे २०२५ ■ आरएनआय – एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रू. ।पाने ४
■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 234 ■ Tuesday Dt.13 May 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4

# एसपीचे घर आणि कार्यालय मटक्याच्या विळख्यात शिवाजीनगरसह बीड शहर, पेठ बीड पोलिसांचा मटक्यावाल्यांना आशीर्वाद?


## पोलीस प्रशासनाची मटका माफियांवर कारवाई करण्याची हिम्मत होईना; पोलीस प्रशासन मटका माफियांवर कारवाई करण्याची हिम्मत दाखवणार का?

■ पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांचे घर आणि कार्यालय मटका माफियांच्या विळख्यात?

■ बीडच्या एलसीबीचे अनेक कर्मचारी मटका माफियांच्या संपर्कात?

■ गल्लीबोळात मटक्याचे बुके; बियर बारात राजवटपणे सुरु दाखवा खाकीतला गुरु

■ मटक्यातून कोट्यावधी रुपयांची उलाढाल आणि लाखो रुपयांचा हप्ता पोलिसांच्या खिशात?








बीड । प्रतिनिधी

बीड शहरात मटका माफियांचे हौदास पाहायला मिळत आहे. याकडे पोलीस प्रशासनाचे शाप दुर्लक्ष आहे. शहरा मटका राजरोसपणे आणि खुलेआम सुरू असतानाही, संबंधित पोलीस प्रशासनाची हाताची घडी आणि तोंडावर बोट अशी भूमिका पाहायला मिळत आहे. विशेष म्हणजे पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांचे घर आणि कार्यालय मटका माफियांच्या विळख्यात सापडले आहेत. पोलीस प्रशासनाला दिसत नाही का? का जाणीवपूर्वक पोलीस प्रशासनांनी याकडे दुर्लक्ष करून मटका माफियांना प्रोत्साहन दिले जात आहे. याबाबत मागील काही दिवसांपासून दैनिक महाराष्ट्र आरंभ आवाज उठवत आहे. परंतु पोलीस प्रशासनाची मटका माफियांवर कारवाई करण्याची हिम्मत होत नाही. पोलीस प्रशासन मटका माफियांवर कारवाई करण्याची हिम्मत दाखवणार का? अशी चर्चा सध्या रंगत आहे. मटका खेळणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. यातून लाखो रुपयांची उलाढाल होताना दिसत आहे. विशेष म्हणजे बीडच्या एलसीबीचे अनेक कर्मचारी मटका माफियांच्या संपर्कात आहेत. यामुळे एलसीबीची कारवाई सध्या थंडावली आहे. पोलीस अधीक्षकांच्या घराच्या बाजूला तसेच त्यांच्या कार्यालयाच्या परिसरात मटका खुलेआम सुरू असतानाही पोलिसांचे दुर्लक्ष का? कारवाई न करण्यामागचा हेतू काय? असे अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या समोरील एका बियर बार मध्ये सात ते आठ जण मटका लिहित असतात. तसेच बियर बार मधील कंपाउंड वॉलमध्ये मटक्याचा आड्डा राजवटपणे चालू आहे. त्या ठिकाणी एक सलुनचे दुकान रोड लागत आहे. त्याच्या पाठीमागे मटक्याची दुकान आजही जोमात सुरू आहे. हे सर्व सुरू असताना पोलीस प्रशासनाला का दिसत नाही? का पोलीस प्रशासन जाणीवपूर्वक दुर्लक्ष करून गोरगरिबांचे संसार उध्वस्त

▶ पान २ वर

### शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मटका माफियांचे अड्डे?

शिवराज पान सेंटर चौक, दीप हॉस्पिटल समोर, किनार हॉटेल च्या बाजूला, के एस के कॉलेज रोड, जीवन ज्योत हॉस्पिटलच्या अलीकडे, जुने अंजली हॉटेल, अशा टॉकीज चौक, पंढरी कॉलनी समोर, नगर नाका, पोलीस मुख्यालयाच्या गेटच्या समोर, नगर रोड चंपावती शाळेच्या कॉम्प्लेक्स मधील टपरीवर, पोलीस पेट्रोल पंप, गोरे वस्ती, पवनसुत मंगल कार्यालय, भक्ती कंट्रक्शन चौक, अंबिका चौक, करपरा नदी पुलाजवळ, अंबिका चौक, जाधव बंधूंच्या मंगल कार्यालयाच्या मुख्य रोडवर, बाळासाहेब पिंगळे नगर सम्राट हॉटेल चौक, उमा किरणा समोर, हनुमान मंदिर परिसर, शाहूनगर, अश्विनी हॉटेल कॉर्नर, बस स्टॅन्ड ते अण्णाभाऊ साठे व शाहूनगर कार्तिक लालाच्या समोर, संतोषीमाता टॉकीज समोर, संत नामदेव नगर, पालवन चौक, बी ऍंड सिक वाटप समोर, आंबेडकर भवन समोर, नगर नाका चौक इंदिरानगर नाट्यगृह पंचायत समिती जुनी तसेच इत्यादी ठिकाणी मटका सुरू आहे.

### ..येथे चालतो मटका जोरात?

मुक्ताई पेट्रोल पंप समोर, स्वराज्य नगर वेस, खासबाग देवी मंदिर चौक, खासबाग आडत मार्केट, खासबाग चौक, यामधील माळे गल्ली, जुना बाजार, बलभीम चौक, माळवे चौक, सावता माळी चौक, सुभाष रोड, सिद्धिविनायक कॉम्प्लेक्स, भाजी मंडई, साठे चौक, भाजी मंडई, राज हॉटेल गल्ली, बस स्टँड समोरील भाग छत्रपती शिवाजी महाराज चौक, ट्रॅव्हल्स लाईनच्या पाठीमागे बस स्टॅन्ड खड्ड्यामध्ये, बस स्टँड सागर हाइट्स, भाजी मंडई रोड, जिल्हा परिषद समोरील दोन्ही बाजूने बशीर गंज चौक, धांडे गल्ली, तेरवी लाईन, जुनी भगवान विद्यालय जवळ, जुनी भाजी मंडई, कबाड गल्ली चौक, कबाड गल्ली, तांबडे हॉस्पिटल चौक, नेहरूनगर सुभाष रोड, कन्या शाळेजवळ सुभाष रोड, दत्त मंदिर गल्ली, जालना रोड, शिव शारदा बिल्डिंग, कॉर्नर स्टेडियम, मुख्य गेट स्टेडियम गेट, जालना रोड, मिलिटरी फुलेनगर, जालना रोड, खाजा कॉम्प्लेक्स, काकू नाना हॉस्पिटल असे इत्यादी ठिकाणी गुटखा खुल्याम चालतो.

### पेठ बीड पोलीस ठाण्याच्या हद्दीत येथे चालतो मटका जोरात?

पेठ बीड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील हनुमान नगर, एमआयडीसी ऑफिस समोर, रामतीर्थ पॉवर लूम रामतीर्थ, चिंचाच्या झाडाखाली मोंढा, शितल वस्त्र भंडार जुना मोंढा, खानावळ लाईन जुना मोंढा, संतोषी माता मंदिर, शुक्रवार पेठ, बालाजी मंदिर, हिरालाल चौक, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर पुतळा, समता माईचे चमन, कडबा मंडी, भाजी मंडी, मच्छी मटन मार्केट, बामणवाडी, मा वैष्णव मंगल कार्यालय, आकाशवाणी चौक, खंडेश्वरी मंदिर, रमाई चौक, पूरग्रस्त कॉलनी चौक, नळवाडी नाका चौक, नाळवंडी रोड पाण्याच्या टाकीजवळ, गांधीनगर, शिवसेना वेशी जवळ, गांधीनगर शिवनी रोड, तेलगाव नाका, शहंशा नगर, चांदणी चौक, मोहनपुरा लोणार, कंकालेश्वर मंदिर परिसर, शहेनशावली दर्गा, इस्लामपुरा बाबा चौक, मासूम कॉलनी, जहागीर कॉलनी, पुरेशी मोहल्ला, मोमीनपुरा चिंचाच्या झाडाखाली, टी पॉईंट ढगे कॉलनी, बार्शी नाका चौक, तांगडे कॉर्नर, हनुमान मंदिर, कॉर्नर इस्लामपुरा रोड, प्रकाश आंबेडकर नगर, ढोले वस्ती, जुने आरटीओ ऑफिस, खालच्या समोरील इस्लामपुरा रोडवरील रस्त्यालगत हिना पेट्रोल पंप समोर, हनुमान ठाणे, रविवार पेठ, महावीर चौक, बीड पोलीस स्टेशन समोर पेठ, बीड पोलीस स्टेशन समोरून जाणारा नाळवंडी रोडवरील बलभीम नगर, वाल्मिकी नगर, बालाजी मंदिर समोर, या वरील ठिकाणी पेठ बीड पोलीस ठाणे हद्दीमध्ये तसेच इतर ठिकाणी मटका लिहिला व खेळला जातो यामधून लाखोंची उलाढाल एका मटका वाल्याकडून होत आहे. यामध्ये कोट्यावधीची कमाई आणि लाखोंचा पोलीसांचा हप्ता कोणाच्या घशात जात आहे.

# बीड जिल्हा दहावीमध्ये विभागात टॉप; ९६.४७ टक्के निकाल



बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्यावतीने फेब्रुवारी/मार्च–२०२५ मध्ये घेण्यात आलेल्या दहावीच्या परिक्षेचा ऑनलाईन निकाल आज दुपारी १ वाजता जाहिर झाला. छत्रपती संभाजीनगर विभागाचा निकाल ९२.८२% लागला आहे. यामध्ये बीड जिल्हा सर्वाधिक ९६.४७% निकालासह विभागात टॉप ठरला आहे.

बीड जिल्ह्यातून एकूण ४१ हजार ५४१ विद्यार्थ्यांनी दहावीच्या परिक्षा दिली होती. त्यापैकी ४० हजार ७७विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. बीड जिल्ह्यातील निकालात नेहमीप्रमाणे यावेळी देखील मुलीच अव्वल ठरल्या असून मुलींचे उत्तीर्णतेचे प्रमाण ४.८% ने अधिक आहे. सर्व विद्यार्थ्यांचे माध्यमिक शिक्षण विभागाचे शिक्षणाधिकारी नागनाथ शिंदे व अन्य अधिकाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

बीड जिल्ह्याचा दहावीचा निकाल ९६.४७% लागला आहे. छत्रपती संभाजीनगर विभागातील परभणी जिल्ह्याचा निकाल ८९.२४%, जालना ९१.४४%, हिंगोली ८९.०७%, छत्रपती संभाजीनगर ९३.६०% आणि बीड ९६.४७% याप्रमाणे निकाल जाहीर झाला आहे. बीड जिल्ह्यातील २३ हजार २४५ मुले उत्तीर्ण झाले असून १६ हजार ८३२ मुली उत्तीर्ण झाल्या आहेत. मुलांच्या तुलनेत मुलींच्या उत्तीर्णतेचा टक्का ९७.७३% आहे. जिल्ह्यातील २१ हजार ७३७ विद्यार्थ्यांनी प्राविण्य श्रेणी, १२ हजार १०५ विद्यार्थ्यांनी प्रथम श्रेणी तर ५ हजार २७० विद्याथ्यर्थ्यांनी द्वितीय श्रेणी मिळवली आहे. विभागात बीड जिल्हा प्रथम स्थानी असल्याची माहिती बीडच्या शिक्षण विभागाने दिली आहे.

# बीड शहरात विविध घटनेत दोन जण जखमी

बीड । प्रतिनिधी

शहरातील स्वराज्य नगर येथे बीजपुरवठा सुरळीत करण्यासाठी पोलवर काम करीत असताना नालीत पडून खासगी इसम गंभीर जखमी तर रस्त्यावर लोंबकळणारी विद्युत तारेचा डोक्याला स्पर्श झाल्याने करंट लागून एकजण असे या दोन वेगवेगळ्या घटनेत दोघे गंभीर जखमी झाल्याच्या दोन घटना आज मंगळवारी दुपारी बीड शहरात घडल्या आहेत. या दोघांवरही जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत. बिबीशन भोसले (वय ५० वर्ष) रा. संत कबीर नगर, बीड, महेश गव्हाणे (वय १९ वर्ष) रा.तेली गल्ली, पेठ बीड असे दोन्ही जखमींची नावे आहेत. काल दुपारी शहरात वादळीवाऱ्यासह अवकाळी पाऊस झाला. यावेळी अनेक ठिकाणी विद्युत तारा तुटून बीजपुरवठा खंडीत झाला होता.

▶ पान २ वर

cmyk

# दहावीच्या निकालाचा लातूर पॅटर्न; विभागात ११३ विद्यार्थ्यांना १०० टक्के गुण, मुलींनी मारली बाजी

लातूर । प्रतिनिधी
राज्यात १२ वीनंतर आता दहावी बोर्ड परीक्षेचा निकाल आज जाहीर झाला. राज्यात यंदा दहावीचा निकाल ९४.१० % लागला असून कोकण विभागाने बाजी मारली आहे. कोकण विभागाचा निकाल ९८.८२ टक्के असून नागपूर विभागात सर्वात कमी ९०.७८ टक्के निकाल लागला आहे. लातूर पॅटर्नचा यंदाही म्हणावा तेवढा निकाल दिसला नाही. कारण, राज्यातील ९ विभागांपैकी लातूर विभागाचा निकाल यंदा शेवटून दुसऱ्या क्रमांवर असून ९२.७७ टक्के एवढा आहे. मात्र, लातूरमधील ११३ विद्यार्थ्यांनी १०० टक्के गुण मिळवल्याने पुन्हा एकदा लातूर पॅटर्नची चर्चा होताना दिसून येईल. राज्यात एकूण २११ विद्यार्थ्यांना १०० टक्के गुण मिळाले असून लातूरमधील ११३ विद्यार्थ्यांनी १०० टक्के गुण मिळवत देदीप्यमान कामगिरी बजावल्याचं दिसून येतं. दरम्यान, लातूर विभागात धाराशिव जिल्ह्याने अव्वल स्थान पटकावले आह.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या छत्रपती लातूर विभागीय मंडळाचा २०२५ चा निकाल ९२.७७ टक्के लागला आहे. येथील विद्यार्थ्यांनी शंभर टक्के गुण घेण्याची परंपरा यावर्षीही कायम ठेवली. जवळपास ११३ विद्यार्थ्यांनी शंभर पैकी १०० गुण घेतले आहेत. राज्यात शंभर टक्के गुण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या २११ असण्याची माहिती आहे. त्यापैकी ११३ विद्यार्थी लातूर विभागाचे आहेत, अशी माहिती लातूर बोर्डचे विभागीय अध्यक्ष सुधाकर तेलंग यांनी दिली.

लातूरमधील ९७ हजार ९९० विद्यार्थी उत्तीर्ण

लातूर विभागाचा निकाल ९२.७७ टक्के निकाल लागला असून, या परीक्षेसाठी ९७ हजार ९९० विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. ३५ टक्क्यांवर ७ हजार ६७७ उत्तीर्ण झाले. ४५ टक्यांवर गुण घेणारे विद्यार्थी २४ हजार २८० आहेत. तर, प्रथम श्रेणीत ३२ हजार ३३५ तर प्राविण्यासह ३३ हजार ६९८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. या परीक्षेसाठी लातूर विभागातून १ लाख ५ हजार ६१९ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. त्यात १ लाख ७ हजार ८ विद्यार्थ्यांची नोंदणी झाली होती. त्यातील ९७ हजार ९९० उत्तीर्ण झाले आहेत. त्यामध्ये, शंभर टक्के गुण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ११३ आहे.

लातूर विभागीय मंडळात मुलींचीच बाजी

लातूर विभागीय मंडळात ९७.३७% निकालासह धाराशिव जिल्हा पहिल्या क्रमांकावर आहे. ९२. ३६ टक्क्यांसह लातूर दुसऱ्या क्रमांकावर, तर ९१.९३ टक्क्यांसह नांदेड तिसरा क्रमांकावर आहे. बारावी पाठोपाठ दहावीच्या निकालातही लातूर विभागीय मंडळात धाराशिव जिल्ह्याचा दबदबा पाहायला मिळाला. लातूर विभागातून ९५.३७% निकालासह धाराशिव जिल्हा अव्वल ठरला. यापूर्वी एचएससी बोर्डाच्या निकालातही धाराशिव जिल्ह्याने पहिला क्रमांक मिळवला होता. तर दुसरीकडे विभागाच्या एकूण निकालात मुलींचे वर्चस्व पाहायला मिळालं ९५.४९% निकालासह दहावी परीक्षा निकालात मुलींनी बाजी मारली. लातूर विभागात ४४६ शाळांचा शंभर टक्के निकाल लागला. तर दहा शाळांचा शून्य टक्के निकाल लागला. शून्य टक्के निकाल लागलेल्या शाळांमध्ये लातूर आणि नांदेडमधल्या प्रत्येकी चार तर धाराशिव जिल्ह्यातील दोन शाळांचा समावेश आहे. लातूर विभागीय मंडळाचा दहावीचा एकूण निकाल ९२.७७% एवढा लागला आहे.

## कोमलवाडी येथील रोहित आडे दहावीच्या परीक्षेत उत्तीर्ण!



गेवराई । प्रतिनिधी
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाने इयत्ता दहावीचा निकाल आज ऑनलाईन जाहीर केला आहे. यामध्ये गेवराई तालुक्यातील माध्यमिक विद्यालय देवपिंपरी या शाळेचा विद्यार्थी रोहित आडे यांनी दहावीच्या परीक्षेत ६३.६०% घवघवीत यश संपादित करीत आपल्या आई-वडिलांची मान अभिमानाने उंचावण्याची कामगिरी केली आहे. या यशाबद्दल सर्व स्तरावरून कौतुक होत आहे तसेच शुभेच्छांचा वर्षाव होताना दिसत आहे.

# ७८ हजारांच्या सौरऊर्जा प्लेट चोरी

बीड । प्रतिनिधी



तालुक्यातील नवगनराजुरी येथील एका वृध्द महिलेच्या शेतातील विहीरवर सौरऊर्जा पंप बसविण्यात आले आहे. या पंपाच्या सौरऊर्जा पॅनलच्या ७८ हजार किंमतीच्या एकूण ६ प्लेट अज्ञात चोरट्याने चोरुन नेल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी बीड ग्रामीण पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सीताबाई उत्तमराव बनकर राहणार राजुरी नवगण (वय ६५ वर्ष) यांचे शेत गजानन सहकारी साखर कारखाना परिसरात असून गट नंबर ६२० मध्ये त्यांची स्वत:ची विहीर आहे.

या विहिरीवर सोलार पॅनल बसवलेले असून त्याद्वारे त्या जलसिंचन व्यवस्था करत होत्या, परंतु दिनांक ०८ मे २०२५ गुरुवारी मध्यरात्री साडेबारा ते अडीच वाजण्याच्या दरम्यान अज्ञात चोरट्याने त्या विहिरीवरील सोलार पॅनलच्या प्लेट चोरून नेल्या आहेत. एकूण ६ प्लेटची चोरी झाली असून एका प्लेटची १३ हजार रुपये किंमत असून असे एकूण ७८ हजारांच्या सौरऊर्जा प्लेट चोरी झाल्याची फिर्याद सीताबाई बनकर यांनी दिली आहे. या फिर्यादीवरून बीड ग्रामीण पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. ग्रामीण पोलीस अधिक तपास करीत आहेत.

पान १ वरून...

### पोलीस अधीक्षकांच्या घराजवळ मटका...

करण्याचा हेतू आहे. पोलीस अधीक्षक यांच्या घराच्या परिसरात आणि कार्यालयाच्या परिसरात मटका चालवणे हे कितपत योग्य आहे. पोलीस प्रशासनाचे घर आणि कार्यालय परिसरात अवैध धंदे चालवत असतील तर शहरात व ग्रामीण भागात का? चालणार नाही. तसेच बीड शहरातील सर्व ठाणे प्रमुखांच्या रायटर हे मटका माफियांकडून वसुली करत असल्याची चर्चा ऐकायला मिळत आहे. यांची तात्काळ चौकशी करून बदली करणे गरजेचे आहे. शहरातील प्रमुख चौकात चौकात व नामांकित गल्लीबोहात मटक्याचे बुके राजवटपणे चालू आहेत. यातून कोट्यावधी रुपयांची उलाढाल आणि लाखो रुपयांचा हप्ता पोलिसांच्या खिशात जात आहे. यामुळेच पोलीस प्रशासन कारवाई करण्याची हिम्मत दाखवत नसेल. यावर बीडच्या एमसीबीची कारवाई पण थंडावली आहे कारण यांची पेक्षा अनेक कर्मचारी मटका माफियांच्या संपर्कात असल्याने कारवाई होताना दिसत नाही. याकडे पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत हे विशेष लक्ष घालून कारवाई करणार का? हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे?

ग्रामीण पोलीस ठाणे हद्दीतील अनेक ठिकाणी अवैधरित्या मटका राजरोसपणे चालू आहे. त्यामुळे ग्रामीण पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रातील ग्रामीणमध्ये अनेक ठिकाणी मटका सुरू आहे. तरी त्या ठिकाणावरील सर्वच ग्रामीण पोलीस स्टेशन बीड तालुका मध्ये येणाऱ्या सर्वच गावांमध्ये आजही मटका सुरू आहे. परंतु पोलीस प्रशासन यावर कारवाई करत नाही. उलट पोलीस प्रशासनाच्या सहकार्यामुळे आणि त्यांच्या आशीर्वामुळेच मटका माफी यांचे चांदीचे दिवस आले असल्याचे नागरिकांतून बोलले जात आहे. असे अवैध धंद्यामुळे अनेकांचे संसार उध्वस्त झाले आहेत. त्यामुळे पोलीस प्रशासनाची तातडीने लक्ष घालून कारवाई करण्याची मागणी होत आहे.

### बीड शहरात विविध घटनेत दोन जण जखमी...

काही भागात आज सकाळपर्यंत वीजपुरवठा सुरळीत झालेला नाही. यामुळे आज सकाळी स्वराज्य नगर येथे वीजपुरवठा सुरळीत करण्यासाठी दुरुस्तीचे काम सुरू होते. यासाठी खाजगी इसम बिबीशन भोसले हा पोलवर चढून काम करीत होते. त्यांचा तोल जाऊन ते पोलवरुन खाली नालीत पडल्याने मार लागून गंभीर जखमी झाले आहेत. घटना घडताच त्यांना तातडीने १०८ रुग्णवाहिकेतून जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. तर दुसरी घटना शहरातील पेठ बीड भागातील तेली गल्ली येथे घडली असून, महेश गव्हाणे हा तरुण रस्त्याने जाताना विद्युत प्रवाह सुरू असलेली लोंबकळणाऱ्या तारेचा डोक्याला स्पर्श झाला. यामुळे विजेचा जबर करंट लागला आणि तरुण जागीच कोसळला घटनास्थळी उपस्थित नागरिकांनी त्यास तातडीने जिल्हा रुग्णालयात दाखल केले. या दोघांवरही सध्या जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

महावितरण मध्ये खाजगी माणसांचा वापर

महावितरण मध्ये प्रत्येक डीपी निहाय कर्मचारी नियुक्त असतात. तसेच देखभाल दुरुस्तीसाठी अनेक एजन्सीज आहेत. तरीही काही कर्मचारी स्वत: काम न करता काही खाजगी इसमांच्या माध्यमातून पोलवर चढणे, तारा बदलने, डीपी बसविणे असे विविध अवघड कामे करुन घेतात. पण असा एखादा अपघात घडला आणि जीवाचे काही बरेवाईट झाले तर याला जबाबदार कोण ? त्यांच्या कुटुंबाला कोण मदत करणार असे प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

## स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत उतरणार : बोरुडे

### धानोरा गटातील शिक्षण, आरोग्य, रोजगार आणि न्यायासाठी कायम जनतेसोबत

बीड । प्रतिनिधी



आष्टी तालुक्यातील शिरापुर गावातील सामान्य कुटुंबात जन्मलेला, संघर्षातून घडलेला, आणि समाजासाठी काहीतरी देण्याची जिद्द असलेला युवा तरुण तुषार बोरुडे यांनी आज जिल्हा परिषद निवडणूक लढवण्याची तयारी केली. आई वडील शेती, मोलमजुरी करत असून लहानपणापासूनच त्यांनी गरिबीचे चटके सहन करत शिक्षण पूर्ण केलं. आज ते समाजसेवेच्या क्षेत्रात काम करत असून, अनेक गरजू लोकांसाठी आधार बनले आहेत. माझ्या सारख्या सामान्य घरातील मुलांनाही राजकारणात प्रवेश मिळायला हवा जेणेकरून समाजाची खरी गरज ओळखणारे लोक निर्णय घेतील, असं तुषार बोरुडे यांनी आपल्या प्रसिद्धी पत्रकात सांगितले.

त्यांचा भर शिक्षण, आरोग्य, युवांसाठी रोजगार, आणि पारदर्शक प्रशासन या मुद्द्यांवर असणार आहे.अनेक अनाथ, हुशार विद्यार्थ्यांना मोफत शालेय साहित्य, अपंगासाठी मोफत व्हिलचेअर, अन्नदान असे अनेक सामाजिक उपक्रम त्यांनी राबवले आहेत. राजकारण हे सत्तेसाठी नाही, तर समाजसेवेसाठी असावं हीच माझी भूमिका आहे.

शिक्षण, आरोग्य, रोजगार आणि पारदर्शक व्यवस्था यासाठी मी तुमच्या प्रत्येकाच्या दारी पोहचणार आहे तरी मला तुमची साथ हवी आहे.तुमचा विश्वासच माझी ताकद ठरणार आहे.माझं बालपण गोरगरीबीत गेलं, पण स्वप्न मोठं होतं. समाजासाठी काहीतरी करून दाखवायचं ते स्वप्नं तुमच्या आशिर्वाद व साथीन पुर्ण होणार. झोपडपट्टी, शेत, वस्ती, गल्ली, प्रत्येकासाठी मुलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करणार असे तुषार बोरुडे यांनी सांगितले.

## आंतरराष्ट्रीय खेळाडू अविनाश साबळे यांच्या घरी सुरेश पाटलांनी मातोश्रीसह दिली भेट

आष्टी । प्रतिनिधी
आंतरराष्ट्रीय ऑलम्पिक स्पर्धेमध्ये भारताला सुवर्णपदक मिळवून देणारे, क्रीडा क्षेत्रातील सर्वोच्च अर्जुन पुरस्कार प्राप्त आणि नुकताच महाराष्ट्र सरकारने शिवछत्रपती क्रिडा पुरस्कार देऊन गौरव केलेले विश्ववेजेता अविनाश साबळे यांच्या घरी मातृदिनाच्या दिवशीच शिव संघर्ष ग्रुप महाराष्ट्र राज्याचे पदाधिकारी तथा समाजसेवक सुरेश पाटील यांनी आपल्या आईसह भेट दिली.



अविनाश साबळे यांनी आत्तापर्यंत अनेक पुरस्कार प्राप्त केले आहेत यापैकी प्रमुख पुरस्कार म्हणजे अर्जुन पुरस्कार २०२२ मध्ये क्रीडा क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरीसाठी देण्यात आला आहे त्याशिवाय अविनाश साबळे यांना नुकताच महाराष्ट्र सरकारचा शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार आणि अतिविशिष्ट सेवा पदक देखील देण्यात आले आहे.

अविनाश साबळे यांनी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धेमध्ये सुवर्ण व रौपे पदक जिंकले आहे २०१८ मध्ये त्यांनी ३००० मीटर स्लीपर चेस मध्ये राष्ट्रीय विक्रम केला होता तसेच २०२२ च्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत त्यांनी रौप्य पदक जिंकले होते.

आंतरराष्ट्रीय ऑलिंपिक स्पर्धेमध्ये पराक्रम करत भारताला सुवर्णपदक, रौप्य पदक मिळवून देणारे, भारताचे प्रतिनिधित्व करणारे, राष्ट्रीय स्तरावर क्रीडा क्षेत्रातील विविध पुरस्कार व लष्करामधील उत्कृष्ट सेवा बद्दल मिळालेले पुरस्कार अविनाश साबळे यांच्या आष्टी तालुक्यातील मांडवा गावातील घरी जाऊन सामाजिक कार्यकर्ते सुरेश पाटील यांनी आपल्या मातोश्रीसह भेट घेतली. यावेळी अविनाश साबळे यांचे तोंडभरून कौतुक केले व जन्मदात्या आई वडिलांचे मातृदिनानिमित्त आशीर्वाद घेतले. यावेळी अविनाश साबळे यांच्या कुटुंबातील सदस्य उपस्थित होते.

## श्री नारदस्वामी विद्यामंदिर येथे माजी विद्यार्थी मेळावा मोठ्या उत्साहात संपन्न

# माजी विद्यार्थ्यांनी दिला जुन्या आठवणींना उजाळा!

बीड । प्रतिनिधी
लहानपणी नकोशी वाटणारी शाळा नंतर मात्र हवीहवीशी वाटते. याचा प्रत्यय रविवारी दि. ११ मे रोजी बीड शहरातील नवा मोंढा परिसरात असणाऱ्या श्री नारदस्वामी विद्यालयात झालेल्या माजी विद्यार्थ्यांच्या मेळाव्यात आला. जवळपास २३ वर्षांनंतर एकत्र आलेल्या या शालेय मित्रांनी शाळेत असताना केलेल्या गमती-जमती, शिक्षकांनी केलेली शिक्षा, अशा अनेक आठवणींना उजाळा दिला. श्री नारदस्वामी विद्यालयाच्या या माजी विद्यार्थी मेळावा कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री बडेबाबा शिक्षण प्रसारक मंडळ लहुरी संस्थेचे संचालक श्री प्रसादजी संपतराव खांडेकर हे होते. तर व्यासपीठावर प्रमुख पाहुणे श्री चौरे सर, श्री. कागदे सर आणि श्री. शिरसट सर, श्री शेंडगे सर आदी उपस्थित होते.




बीड शहरातील नवा मोंढा परिसरात असणाऱ्या श्री नारदस्वामी विद्यामंदिर या शाळेत रविवार दिनांक ११ मे २०२५ रोजी शाळेत २००२ मध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांपासून ते २०२४ या शैक्षणिक वर्षात शाळेतून दहावी पास झालेल्या एकूण २३ वर्षांच्या काळातील माजी विद्यार्थ्यांचा मेळावा झाला. या मेळाव्याचे उद्घाटन संस्थेचे संचालक श्री प्रसादजी संपतराव खांडेकर यांनी केले. या स्नेह मेळाव्यासाठी विद्यालयाचे मागील तेवीस वर्षातील सर्व विद्यार्थी एकत्र जमले होते. सध्या विविध क्षेत्रात कार्यरत असलेले विद्यार्थी या वेळी एकत्र आल्याचा आनंद सर्वांच्या चेहऱ्यावर दिसून येत होता. धकाधकीच्या आयुष्यात प्रत्येक जण आपापल्या कामात गुंतलेला असला तरी पण श्री नारद स्वामी विद्यालयाची आठवण कायम येत असल्याचे प्रत्येक विद्यार्थी बोलून दाखवत होता. यावेळी सर्व विद्यार्थी लहान होऊन शाळेमध्ये रमले होते, या वेळी सर्व विद्यार्थ्यांनी शालेय जीवनातील जून्या आठवणींना उजाळा दिला. यावेळी त्यांनी छड्या ही खाल्ल्या. हसत खेळत संपूर्ण दिवस कसा गेला हे कोणालाच कळले नाही.

सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कागदे आणि शिरसट यांचे मोलाचे मार्गदर्शन आणि सर्वतोपरी सहकार्य लाभले. तसेच संस्थेचे कर्मचारी श्री. राठोड यांचेही सहकार्य लाभले. कार्यक्रमाच्या सुयोग्य नियोजनिकरीता सचिन बुरांडे, ज्ञानेश्वर बामदळे, देवेंद्र सोनवणे सोमनाथ भोसले यांनी विशेष परिश्रम घेतले व त्यांना बाकी सर्व विद्यार्थी मित्रांनी सहकार्य केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार नारायण महानोर यांनी मानले. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात कार्यरत असलेले श्री नारदस्वामी विद्यामंदिर या शाळेचे विद्यार्थी कार्यक्रमासाठी उपस्थित होते.

# आदर्श देवगाव प्रीमियर लीग प्रथम पारितोषिक स्वराज्य क्रिकेट क्लब देवडी

### द्वितीय पारितोषिकचे मानकरी महाराष्ट्र नागरी वारीयर्स, प्रमुख मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण

वडवणी । प्रतिनिधी
वडवणी तालुक्यातील आदर्श देवगांव या ठिकाणी गेल्या काही दिवसांपूर्वी क्रिकेट प्रीमियर लीगच्या स्पर्धा चालू होत्या प्रीमियर लीग आज मेगा फायनल ीींलह स्वराज्य क्रिकेट क्लब देवडी ीी महाराष्ट्र नागरी वारीयर्स यांच्या मध्ये झाला व स्वराज्य क्रिकेट क्लब यांनी यामध्ये प्रथम पारितोषिक पटकावले. प्रथम पारितोषिक परडी माटेगाव सरपंच माधव काका शेंडगे व माऊली दादा सुरवसे यांच्या संयुक्त विध्यमाने (३३३३३) देण्यात आले तसेच द्वितीय पारितोषिक चे मानकरी महाराष्ट्र नागरी वारीयर्स यांना मिळाले. द्वितीय पारितोषिक शेतकरी नेते जगदीश काका फरताडे यांच्या वतीने (१७७७७) देण्यात आले तसेच लीग चे तिसरे पारितोषिक आदर्श क्रिकेट क्लब यांना देण्यात आले. त्याचे मानकरी उपसरपंच महादेव अण्णा सुरवसे यांच्या वतीने (११११११) देण्यात आले व बेस्ट बॉलर म्हणून पर्पेल कॅप सखाराम सुरवसे यांना देण्यात आली. पार्पेल कॅप चे मानकरी ग्रा.प.सदस्य गणेश निवृती गवळी यांच्या वतीने (२५००) देण्यात आले त्याच बरोबर ीरपसश कॅप (बेस्ट बॅट्समन) हा पुरस्कार राहुल पवार यांना देण्यात आला.



याचे मानकरी दिनकर भैय्या सुरवसे यांच्या देण्यात (२५००) देण्यात आला व man of the serise दिनेश पैठेने यांना देण्यात आला. त्याचे मानकरी नक्ष मारोती सुरवसे यांच्या वतीने(३१००) देण्यात आला आणी टूर्नामेट ऑफ िंहश प्लेयर म्हणून शिकंदर शेख यांना देण्यात आला त्याचे मानकरी आमच्या गावचे सरपंच मुकुंद भैय्या सुरवसे यांच्या वतीने (३१००) देण्यात आले व या लीग साठी गवळी सर यांच्या कडून मोफत पाणी पुरवण्यात आले (१२) दिवस व लीग साठी लागलेले सर्व बॉल ह.भ.प.मछिंद्र महाराज गवळी व ह.भ.प. गोविंद महाराज सुरवसे यांच्या वतीने तब्बल (१२०) बॉल देण्यात आले आणी विशेष सहकार्य म्हणून वी. संदीपान सुरवसे, उत्तम बप्पा सुरवसे, इंजिनियर परशु आबा सुरवसे, लाईनमेन् साहेब दादा जाधव, दत्ता पाटील सुरवसे, विकास गिरगुणे, सखाराम सुरवसे, महेश सुरवसे, विलास गवळी, जोतिराम इतापुरे, बाबासाहेब आबा सुरवसे, तसेच कमिटी यांनी अतिशय अनमोल असे सहकार्य केले. क्रिकेट स्पर्धा पाहण्यासाठी सर्कलमधील तरुणांची मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

## सैनिकांचे मनोधैर्य वाढविण्यासाठी वंचितच्या वतीने गेवराई शहरात तिरंगा रॅली

गेवराई । प्रतिनिधी
दि. ११ मे रोजी वंचित बहुजन आघाडी गेवराई तालुक्याच्या वतीने श्रध्येय बाळासाहेब आंबेडकर यांच्या वाढदिवसानिमित्त भारत-पाक युद्धजन्य परिस्थीतीत भारतीय सैनिकांचे मनोधैर्य उंचाविण्यासाठी गेवराई शहरात तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.



वंचित बहुजन आघाडीचे संस्थापक अध्यक्ष प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर यांच्या अदेशावरुन आज दि. ११ मे रोजी संपूर्ण राज्यभर तिरंगा रॅली काढण्याचे निर्देश देण्यात आले होते, त्यानुसार वंचित बहुजन आघाडी तक्रार निवारण समितिचे राज्याध्यक्ष विष्णु जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच गेवराई तालुका अध्यक्ष पप्पु गायकवाड व बीड जिल्हा उपाध्यक्ष राजाभाऊ पोकळे यांच्या नेतृत्वाखाली गेवराई शहरात मोटारसायकलवरून भव्य तिरंगा रॅली काढण्यात आली होती, यावेळी जय भारत, जय जवन जय किसान या घोषणांनी अक्षरशः गेवराई शहर दणाणून गेले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात संविधानाच्या प्रस्तावनेला पुष्पहार अर्पण करून रॅलीला सुरुवात करुन शास्त्री चौक येथे लालबहादूर शास्त्री यांना पुष्पहार अर्पण करून, शहिद जवानांना श्रध्दांजली अर्पण करून रॅलीचा समारोप केला.

यावेळी किशोर भोले, अर्जून सुतार, अमोल सुतार, ॲड. सोमेश्वर कारके, ज्ञानेश्वर हवाले, भारत हवाले, प्रकाश भोले, छगण खरात, माणिक राठोड, किशोर चव्हाण, बप्पासाहेब काळे, शिवाजी केदार, विकास गायकवाड, प्रशांत केदार, सुनिल चव्हाण, नितिन खापरे, देवेंद्र धुरंधरे, कृष्णा हतागळे, साईनाथ सुतार, सतिष नाडे, सिध्दार्थ शेजुळ, महादेव निकाळजे, सतिश निकाळजे, अंकुश बनसोडे, संतोष पवार, कैलास बनसोडे, अतुल हतागळे, चरणदास हतागळे, अमोल पवार यांच्यासह शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.

## बुद्ध पौर्णिमानिमित्त युद्ध नको जगाला बुद्ध हवा
# सिरसाळ्यात शांती कॅण्डल मार्च शांततेत

सिरसाळा । प्रतिनिधी

सिरसाळा येथे दि.१२ मे २०२५ सोमवार रोजी आज यांच्या २५८७ व्या बुद्ध पौर्णिमा निमित्ताने नवीन वर्षभरात सामाजिक उपक्रम व कार्यक्रम राबविले जातात. बुद्ध विहार कुशीनगर सिरसाळा या ठिकाणी शांती कॅण्डल मार्च काढण्यात आला. बुद्ध विहार ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक सिरसाळा कॅण्डल मार्चमध्ये जास्तीत जास्त महिलांचा समावेश दिसून आला आहे.



यावेळी बुद्ध वंदना त्रिशरण पंचशील घेऊन धम्म ध्वज पंचशील झेंडाचे ध्वजारोहण आयु.बनसोडे (मॅडम) यांच्या हस्ते करण्यात आले आहे. बनसोडे (मॅडम) यांनी श्रीलंका भाषे मध्ये बुद्ध वंदना संघ वंदना पंचशील पाली भाषेमध्ये त्यांनी उपासक व उपाशीका यांना त्याच भाषेमध्ये सांगण्याचा प्रयत्न केला. अखंड विश्वाला अहिंसा आणि शांतीचा संदेश देणारे महाकारोणिक तथागत गौतम बुद्ध यांच्या २५८७ व्या जयंतीनिमित्त सर्वांना मंगलमय शुभेच्छा दिल्या. बुद्ध धम्म आहे बुद्ध मार्ग आहे. धर्मकांड नाही. बुद्ध मानवा आहे. देवता नाही बुद्ध करुणा आहे. शिक्षा नाही. बुद्ध शुद्ध आहे.थोतांड नाही बुद्ध विचार आहे. दुराचार नाही बुद्ध शांती आहे. हिंसा नाही बुद्ध प्रबुद्ध आहे. युद्ध नको बुद्ध हवा जगाला शांतीचा मार्ग देणारे तथागत गौतम बुद्ध.यांच्या जयंती निमित्ताने बुद्ध पौर्णिमेचे निमित्त साधून खीर दान आयु.बाबासाहेब किरवले. यांच्याकडून सो इच्छेने खीर दान करण्यात आली.

बुद्ध जयंती निमित्त उपस्थितआंबेडकर जयंती कमिटी सर्व पदाधिकारी सिरसाळा, यशोधरा महिला मंडळ सर्व सदस्य सिरसाळा यावेळी उपस्थित होते. आयु.राम दादा किरवले, मधुकर किरवले, प्रा.दयानंद झिंजुर्डे, ग्रा.सदस्य संतोष किरवले, खिरादान करणारे बी.एम. किरवले, लखण किरवले, राज किरवले, रणजित रोडे, आतुल आरसुळे, राजकुमार, ढिगांबर उजगरे, आनंद किरवले, उमेश किरवले, तात्या किरवले, सुरेश आपा किरवले, यावेळी दैनिकआरंभ चे परळी तालुका प्रतिनिधी.बापु किरवले.व उपासक उपासिका व भीमसैनिक विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येत उपस्थित होता.

## वडार समाज महाराष्ट्र मजुर शिल्प प्रतिष्ठाणच्या वतीने कामगार दिनादिवशी पुरस्कार सोहळा संपन्न

आष्टी । प्रतिनिधी

पिंपरी चिंचवड येथील वडार समाज महाराष्ट्र मजुर शिल्प प्रतिष्ठाण चिंचवड या सामाजिक संस्थेकडून १ मे कामगार दिनानिमित्त वडार समाज मजुर शिल्प समाज बांधवांना पुरस्कार देऊन सन्मानित केले आहे. आष्टी विधानसभा मतदारसंघाचे आ.सुरेश धस यांच्या मार्गदर्शनाखाली सामाजिक कार्यकर्ते संतोष मुरकुटे व संस्थेचे उपाध्यक्ष सचिन चौगुले यांच्या सौजन्य लाभले. हा सोहळा बर्ड व्हॅली गार्डनमध्ये मोठ्या थाटात संपन्न झाला.

खासदार श्रीरंग अप्पा बारणे यांच्या शुभ हस्ते वडार मजूर दाम्पत्याला शिल्प पुष हार अर्पण केला. राज्यातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या प्रतिभाशाली महिलांना व पुरुषांना प्रशस्तीपत्रक व सन्मानचिन्ह देऊन पुरस्कृत करण्यात आले. विधानपरिषदचे आमदार अमित गोरखे, माजी उपमहापौर तुषारभाऊ हिंगे, कार्यक्रमाचे अध्यक्ष एस.एन. पवार (सेवानिवृत्त शिक्षण संचालक महाराष्ट्र राज्य) स्वागताध्यक्ष शशिकांत लष्करे, विशाल काळभोर, मी वडार महाराष्ट्रचा प्रदेश कार्याध्यक्ष सुरेश धोत्रे, भरत विटकर, शिरूर कॉंग्रेस महिला अध्यक्षा सौ प्रियांका बंडगर उद्योगपती रमेश शिंदे,



राकेश विटकर, सुरेश कुराडे, जेष्ठ साहित्यिक टी.एस. चव्हाण, स्विकृत नगरसेविका कु अपर्णाताई कुराडे, विठ्ठल मोरे, ललिता धनावडे, मारुती धोत्रे, शाम पवार, अशोक पवार, हरीश बंडीवडार आदी मान्यवर उपस्थित होते.

राज्यातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या प्रतिभाशाली महिलांना व पुरुषांना प्रशस्तीपत्रक व सन्मानचिन्ह देऊन पुरस्कृत करण्यात आले. तसेच समाज रत्न पुरस्कार म्हणून सौ. निर्मलाताई कुराडे, सुनीता जाधव, श्री. यल्लाप्पा कुसाळकर तर समाज गौरव म्हणून श्री. लहू बंदपट्टे, काशिनाथ आनंदकर सोलापूर चंदर मुधोळ, पुणे, सौ.उज्वला पवार,धाराशिव, बाळु दोडकर, पुणे, अशोक जाधव, पुणे, चंद्रकांत जाधव, कोल्हाट, निखिल आळकुंटे, पुणे, वसंत पवार, नवी मुंबई गुण गौरव पुरस्कार, कु.डॉ. स्वजल जाधव, कु.सोनु आनंद मोरे (पोलीस), कु. सोनाली संदीप शिंदे, खाण कामगार जेष्ठ नागरिक सन्मान करू तुकाराम शेलार, म्हादू वेताळ यांनी पुरस्काराने सन्मानित केले आहे. या पुरस्कारासाठी सौजन्य म्हणून संतोष आण्णासाहेब मुरकुटे, संस्थेचे उपाध्यक्ष सचिन चौगुले यांचे लाभले व विशेष सहकार्य विष्णु चौगुले यांनी केले. संयोजक उपाध्यक्ष सचिन चौगुले, अमर दौंडकर, राजु कुसाळकर, अनिल विटकर, अनंत नलावडे, अक्षय पवार, अक्षय कुसाळकर यांनी संयोजक म्हणून काम पाहिले तर प्रास्ताविक शामराव विटकर व आभारप्रदर्शन लखन पाटकर यांनी केले.या पुरस्कार सोहळ्यासाठी समाज बांधव व भागिनी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## प्राचार्य सिद्दीकी नवीद महाराष्ट्र गौरव पुरस्काराने सन्मानित

बीड । प्रतिनिधी

केंद्रीय स्पर्धा परिक्षेचे उर्दू भाषेत मार्गदर्शन करणारी पुस्तक 'मुझे बनना है यु.पी.एस.सी टॉपर चे लेखक आणि बीड शहरातील नॅशनल उर्दू माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य सिद्दीकी नवीद यांना परभणी येथे नुकतेच महाराष्ट्र गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.



प्राचार्य सिद्दिकी नवीद हे गेल्या अनेक वर्षांपासून शिक्षण क्षेत्रात भरीव अशी कामगिरी करीत आहेत. एका नामांकित शाळेचे प्राचार्य पद सांभाळून ते लेखन कार्यही करतात. काही वर्षांपूर्वी त्यांनी मुझे बनना है यूपीएससी टॉपर हे पुस्तक उर्दू भाषेतून लिहिले आहे. या पुस्तकातून विद्यार्थ्यांना योग्य असे मार्गदर्शन मिळते. शिवाय गेल्या काही वर्षात यूपीएससी मध्ये घवघवीत यश मिळवून उच्च पदस्थ अधिकारी झालेल्या अधिकाऱ्यांबद्दल माहिती सांगणारे लेखांचे संकलन ही यात आहे. त्यांच्या अशाच दैदीप्यमान कारकीर्दीची नोंद घेऊन परभणी येथील जयहिंद सेवाभावी शिक्षण संस्थेने त्यांना खासदार संजय उर्फ बंडू जाधव यांच्या हस्ते महाराष्ट्र गौरव पुरस्कार देऊन सन्मानित केले. बीड जिल्ह्याच्या शिक्षण क्षेत्रासाठी हि अभिमानास्पद बाब आहे. सिद्दीकी नवीद यांना शॉल, पुष्पगुच्छ, प्रमाणपत्र व स्मृती चिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी इंजि. आर.डी. मगर (महाराष्ट्र भूषण), भगवान रावजी वाघमारे (उप महापौर, परभणी), गफ्फार मास्टर (चित्रपट निर्माते) परभणी, पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजक अब्दुल सत्तार इनामदार परभणी यांची प्रमुख उपस्थिती होती. तर बीडहून खास या कार्यक्रमासाठी मन्नान भाई, मोमीन वाजेद, अब्दुल वाहेद ऊर्फ जाझेब, इंजि. मुहम्मद असीर यांचीही उपस्थिती होती.

## गणपत बनसोडे यांच्या निधनाने सच्चा कार्यकर्ता गमावला; ना. पंकजा मुंडेंनी व्यक्त केल्या शोक भावना

परळी वैजनाथ । प्रतिनिधी



भाजपचे नागापूर येथील ज्येष्ठ कार्यकर्ते गणपत बनसोडे यांच्या निधनाने आपण सच्चा व अनुभवी कार्यकर्ता गमावला आहे अशा शब्दांत राज्याच्या पर्यावरण व वातारणीय बदल तसेच पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी आपल्या शोक भावना व्यक्त करत त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण केली.

गणपत बनसोडे यांच्या निधनाचे वृत्त समजताच ना. पंकजाताई मुंडे यांनी त्यांचा मुलगा यशपाल बनसोडे व बनसोडे कुटुंबियांचे दूरध्वनीवरून सांत्वन केले. वैद्यनाथ साखर कारखान्याचे संचालक पद भूषविलेले गणपत बनसोडे हे भाजपचे एक निष्ठावंत व सच्चे कार्यकर्ते होते. ते जिल्हा मध्यवर्ती बँकेचे देखील संचालक होते. एक मनमिळावू, अनुभवी व सर्वांच्या मदतीला धावून येणारे अशी त्यांची ख्याती होती. ते आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ कार्यकर्ते होते, त्यांच्या निधनाने आपल्याला दुःख झाले आहे, अशा शब्दांत शोक व्यक्त करत ना. पंकजाताई मुंडे यांनी त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण केली.

## छत्रपती संभाजी महाराज जयंतीनिमित्त आयोजित शिबिरात ४६ रक्तदात्यांनी केले रक्तदान

धारूर । प्रतिनिधी

येथील छत्रपती संभाजी नगर येथे छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त कदम शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या रक्तदान शिबिरात युवकांनी मोठ्या प्रमाणावर सहभाग नोंदवत रक्तदान केले आयोजित करताना शिबिरात ४६ रक्तदात्यांनी रक्तदान केले. प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त धारूर येथील छत्रपती संभाजी नगर येथे विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून दि.११ रविवार रोजी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.



या रक्तदान शिबिरात मोठ्या संख्येने युवकाने सहभाग नोंदवून ४६ रक्तदात्यांनी रक्तदान केले. तत्पूर्वी या रक्तदान शिबिराचे उद्घाटन माजी नगराध्यक्ष डॉ. स्वरूपसिंह हजारी यांच्या हस्ते संपन्न झाले तर या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून अर्जुनराव गायकवाड, बालाजी चव्हाण, राजू सोनवणे, सुरेश सावंत, नितीन शिनगारे, डॉ. मयूर सावंत, अतुल शिनगारे, प्रदीप नेहरकर, चंद्रकांत भांगे, मोहन भोसले, नाथा ढगे, रवी गायसमुद्रे, सतीश पोदार, कैलास बोरगावकर, बबलू शुक्ला आदींची उपस्थिती होती.

रक्त संकलन करण्यासाठी स्वराती रुग्णालय येथील डॉक्टरांची टीम या रक्तदान शिबिरात कार्यरत होती हे शिबिर यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी छत्रपती संभाजी महाराज जयंती चे अध्यक्ष गजानन किर्दक, उपाध्यक्ष महादेव काजळे, सचिव रोहित गायकवाड सह मंडळाच्या कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले तसेच या जेवणाची व्यवस्था भोईराज मित्र मंडळाच्या वतीने करण्यात आली होती.

## जन आक्रोश महाआंदोलानास लाखोच्या संख्येने उपस्थीत राहावे : डॉ.रंजीत कसबे

माजलगाव । प्रतिनिधी



दि. २० मे २०२५ मंगळवार रोजी आझाद मैदान मुंबई येथे अनुसूचीत जाती आरक्षणाचे उपवर्गिकरण म्हणजे अ ब क ड या प्रमाणे करुन जुन २०२५ पासुन लागु करण्यात यावे या प्रमुख मागणीसाठी समाजातील विविध विचारधारेतील पक्ष संघटना व आजी माजी कर्मचारी व सकल समाजाच्या वतीने या मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे हा मातंग समाजाच्या जिव्हाळ्याचा प्रश्न आहे.

याकरीता महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यातील समाजातील महिला पुरुष व मुला बाळा सहित लाखोच्या संख्येने उपस्थीत राहावे असे आवाहन करण्यात येत आहे. तरी महाराष्ट्रातील मातंग समाजाने आरक्षणाचे उप वर्गीकरण करण्यात यावे व याची तात्कळ अंमलबजावणी २०२५ ला करण्यात यावी अबकड नुसार अंमलबजावणी करण्यात यासाठी सकल मातंग समाजाने आपल्या अस्तिवासाठी या मोर्चा मध्ये सामिल होण्यासाठी अवाहन डॉंक्टर रंजित कसबे यांनी केले आहे.

## पोलीस खात्यात उत्कृष्ट कामगिरी बजावणाऱ्या सचिन मुंडेंचा बालमित्राकडून सत्कार

धारूर । प्रतिनिधी

धारूर येथील रहिवाशी तथा लातूर जिल्हा पोलीस खात्यात कार्यरत असलेले सचिन शेषराव मुंडे यांनी पोलीस खात्यात उत्कृष्ट कार्य बजावल्याबद्दल नुकतेच लातूरचे पालकमंत्री श्रीमंत राजे शिवेंद्रसिंह भोसले यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला होता. त्याबद्दल त्यांचे बालमित्र इयत्ता दहावी १९९९ बॅच यांच्याकडून विशेष कार्यक्रम घेऊन मोठा भव्य सत्कार करण्यात आला.



धारूर वैद्यनाथ नगर येथील रहिवासी सचिन शेषराव मुंडे यांना नुकत्याच पोलीस खात्यात चांगली कामगिरी केल्याबद्दल पोलीस अधीक्षक यांच्या उपस्थितीमध्ये पालकमंत्र्यांच्या हस्ते सत्कार करून सन्मान करण्यात आला होता. आपल्या बालमित्राचा हा सन्मान झाला हे पाहून धारूर येथे सचिन मुंडे यांचा बालमित्रांकडून भव्य सत्काराचे आयोजन करण्यात आले होते. त्यांचा सत्कार सर्व बालमित्रांच्या हस्ते करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या त्यांनी धारूर शहराची मान उंचावली याबद्दल विशेष कौतुक सर्वांचे वतीने करण्यात आले.

या प्रसंगी बालमित्र सुरेश शेळके, अरुण पिलाजी, भगवान रहेकवाल, नाथा ढगे, विशाल पिलाजी, रामेश्वर खामकर, धनंजय शिनगारे, अमोल साखरे, अमर लोकरे, बालाजी सातपुते, रुपेश दुबे, ज्ञानेश्वर कदम, सुरेश शिंपले, भारत शेळके, राम शेळके, योगेश रुद्रवार, महेश डूबे, बाळू जाधव, महादेव साखरे, डॉ सचिन माने, गणेश काळे, दयानंद इंदुरकर, किरण ओव्हाळ, चाळक, शिनगारे, घोळवे, अरुण चोपडे इत्यादी बालमित्र उपस्थित होते.

## धर्मविर छत्रपती संभाजी महाराज जयंती महोत्सवास उपस्थित रहा : समर्थ शिंदे

चौसाळा । प्रतिनिधी



प्रतिवर्षाप्रमाणे याहीवर्षी बीड तालुक्यातील चौसाळा येथे धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या सार्वजनिक जयंती निमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन केले असल्याची माहीती धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज सार्वजनिक जयंती महोत्सव समितीचे अध्यक्ष समर्थ शिंदे यांनी दिली आहे.

दि. १४ मे रोजी सकाळी ९.३० वाजता धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज अभिवादन सोहळा होणार असुन सकाळी ९-४५ वाजता चौसाळा शहरातुन भव्य मोटारसायकल रॅलीचे आयोजन केले असुन ही रॅली छत्रपती शिवाजी महाराज चौक ते चौसाळा बायपास पर्यत निघणार आहे सकाळी १०-३० वाजता भव्य सार्वजनिक रक्तदान शिबीराचे आयोजन केले असुन सांयकाळी ५-३० वाजता धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेची भव्य मिरवणुक हनुमान मंदीर चौसाळा ते लोकराजा छत्रपती शाहू महाराज चौक चौसाळा असी निघणार असुन या मिरवणुकीचे प्रमुख आकर्षण बेन्जो असणार असुन या मिरवणुकीस मोठया संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज सार्वजनिक जयंती महोत्सवाचे अध्यक्ष समर्थ शिंदे यांनी केले आहे.

## पंचशीलाच्या पालनातच जगाचे कल्याण आहे : भिक्खु धम्मशिल थेरो
### भव्य धम्मरॅली काढून छत्रपती शिवाजीनगर, बलभीम नगर येथील धम्मदीप बुद्धविहारात बुद्ध मूर्तीची प्रतिष्ठापणा

बीड । प्रतिनिधी

बलभीम नगर पालवण रोड बीड येथे तथागत गौतम बुद्ध यांच्या २५६९ व्या जयंती निमित्त, माझी सभापती तथा नगरसेवक विनोद मुळूक यांच्या प्रयत्नातून धम्मदीप बुद्ध विहाराचा लोकार्पण सोहळा व बुद्ध रूप प्रतिष्ठाना कार्यक्रम पूज्ज भन्ते धम्मशील थेरो, पूज्ज भंते डॉ इंदिवन्स महाथेरो, भंते चंद्रमुनी, भंते पय्यावर्धन, व श्रामनेर संघाच्या उपस्थितीत अंबिका नगर ते धम्मदीप बुद्ध विहारा पर्यंत धम्म रॅली काढून बलभीम नगर येथील विहाराचे उदघाटन पूज्ज भंते धम्मशील थेरो यांच्या हस्ते करण्यात आले.



या कार्यक्रमासाठी मा. पप्पूजी कागदे साहेब युवा आर.पी.आय. प्रदेशाध्यक्ष, मा. कल्याण काका आखाडे (एन.सी.पी.) ओ. बी. सि. सेल.प्रदेशाध्यक्ष, जेष्ठ नगरसेवक नर्सिंग आण्णा नाईकवाडे, शिवसेना जिल्हा प्रमुख सचिन मुळूक, राजू जोगदंड, प्रा. प्रदीपजी रोडे सर, ब. स. पा.चे जिल्हाध्यक्ष प्रशांतजी वासनिक,प्रमोदजी शिंदे, नीलकंठ केके वडमारे, कपिलजी सोनावणे, ड विनायक जाधव, ड राजेश शिंदे, पत्रकार सुनील डोंगरे, भास्कर सरपते, प्रा. गायकवाड, डी.जी वानखेडे, गुलाबराव भोलेसर संजय मिसाळ यांची प्रमुख उपस्थिती होती, हे बुद्ध विहारचे काम मागील ४० वर्षा पेक्षा जास्त वर्षा पासून प्रलंबित होते परंतु नगरसेवक विनोजी मुळूक यांच्या प्रयत्नातून हे काम पूर्ण झाले हे धम्मदीप बुद्ध विहार बीड शहरातील पहिले वातानुकुलीत विहार आहे, या विहारा साठी मागील चार वर्षांपासून ड तेजस वडमारे व बलभीम नगर मधील समाज बंधवानी वेळो वेळी नगरसेवक विनोद मुळूक यांच्या कडे पाठपुरावा करून हे विहार पूर्ण करून घेतले आहे, या ऐतिहासिक बुद्ध विहारासाठी ड तेजस वडमारे यांच्या परिवाराकडून, कालकथित अहिल्याबाई विष्णू वडमारे व कालकथित शांताराम विष्णू वडमारे यांच्या स्मरणार्थ आयु. रमाबाई शांताराम वडमारे यांच्या काडून बुद्ध मूर्ती देण्यात आली आहे, त्यावेळी भन्ते धम्मशील थेरो यांनी धम्मदेसनेत सांगितलं माणसाने कसं जगावं, माणसाने माणसाशी कस वागावं, माणसाने मनुष्य कसं बनाव याची शिकवण तथागत बुद्धाने दिली आहे, म्हणून ज्याला सुखाने, शांतीने समाधाने जगायचे आहे त्यांना बुद्धा शिवाय पर्याय नाही, पंचशीलाच्या पालनातच जगाचं कल्याण आहे, जगाचा उद्धार आहे, जगाची शांती पंचशीलाच्या पालनातच आहे, जगाला आजही युद्ध नव्हे तर बुद्धच हावे आहेत असे मत भंते धम्मशील थेरो यांनी मांडले. या वेळी छत्रपती शिवाजीनगर, बलभीम नगर, मित्र नगर, पंचशील नगर, दिलीप नगर, पालवण रोड मधील सर्व बौध्द उपासक उपासिका बालक बालिका मोठया संख्येने उपस्थित होते.

## भागूजीराव ढेकळे विद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा

बीड । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील पाडळसिंगी येथील कृषी पंडित भागूजीराव ढेकळे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा सन २००७-०८ या शैक्षणिक वर्षातील इयत्ता दहावी, बारावी वर्गातील विद्यार्थ्यांचा स्नेह-मेळावा घेण्यात आला. या कार्यक्रमाच्याअध्यक्षस्थानी शिक्षक नेते कल्याणराव वाघमारे हे होते.

आजच्या धकाधकीच्या युगात मित्रांच्या भेटी दुर्मिळ झाल्याने शालेय जीवनातील जुन्या आठवणींना उजाळा देण्यासाठी आणि आपल्या सवंगड्यांना भेटून हितगुज करण्यासाठी हॉटेल नीलकमल बीड येथे रविवार दि.११/५/२००५ रोजी कृषी पंडित भागूजीराव ढेकळे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय पाडळसिंगी येथील सन २००७-०८या शैक्षणिक वर्षातील इयत्ता दहावी, बारावीच्या विद्यार्थ्यांचा स्नेह-मेळावा संपन्न झाला.



यावेळी आत्माराम बांगर, अरुण खाडे, गजानन आढावू, कल्याण करपे, अविनाश पोकळे, राजकर्ण घरत, ज्ञानोबा डोंगरदिवे, बिबीशन घायाळ, राजेंद्र करवंदे, सतीश बहीर आदींची प्रमुख उपस्थित होती.याप्रसंगी सोमीनाथ भोईटे अंकुश जाधव, मिलिंद धुताडमल, शितल राऊत, आशा जाधव, मोहन गव्हाणे, सुनील खेत्रे, शकुंतला माने, शुभांगी पाटोळे, संपत गव्हाणे, रंजीत जाधव, सर्वश्री बांगर, खाडे, करपे, पोकळे, घरत, घायाळ, यांनी आपले मनोगत व्यक्त केले. अध्यक्षीय समारोप प्रसंगी बोलताना कल्याणराव वाघमारे म्हणाले की,आजच्या विज्ञान युगात मुलाकडून बरेच काही शिकण्यासारखे आहे आपण ज्या ठिकाणी आहोत त्या ठिकाणी विश्वास ठेवून काम केले पाहिजे. दिलेल्या ज्ञानाचा भरपूर उपयोग करा. ज्ञान द्या ज्ञान दिल्याने ज्ञान वाढते आपल्या मुलांचे आवडीच्या क्षेत्रात करिअर करा. चांगल्या विचारांची देवाण-घेवाण करा चांगले काम करून विश्वास संपादन करा असे त्यांनी सांगितले.

यावेळी अविनाश दाभाडे, निखिल कानडे, रुद्रा कदम, शोभा मराठे, सुरेखा जगताप, लंका चव्हाण, मंदा काळे, शिवकन्या राऊत, रत्नमाला कबाडे, शेख रिना, नंदकिशोर फुलझळके, सचिन कांबळे, किशोर सुरवसे, विष्णू देवकर, विलास तळेकर, राजेंद्र दाभाडे, नारायण मुंजाळ, गोविंद मुंजाळ, शाम तळेकर, संजय वखरे, अमोल काळे, नितीन जाधव, अर्जुन धनवडे, राम जाधव, बाबासाहेब जाधव, चक्रधर अनभूले, सुभाष भनगे, प्रशांत भोजगुडे, राहुल वडमारे यांच्यासह विद्यार्थ्यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक अंकुश जाधव यांनी केले तर सूत्रसंचालन पल्लवी हाके यांनी केले शेवटी अविनाश दाभाडे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# कोट्यवधींच्या पाणी योजना गिळंकृत; आता जलजीवनचे पाणी तरी मिळणार का?

## आष्टीत कामे अपूर्ण ठेवणाऱ्या कंत्राटदारांवर दंडात्मक करा : कैलास दरेकर

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी मतदारसंघात यापूर्वी राबविण्यात आलेल्या भारत निर्माण, स्वजलधारा, जलस्वराज्य, राष्ट्रीय पेयजल, मुख्यमंत्री पेयजल, प्रधानमंत्री पेयजल यासारख्या विविध योजना राबविण्यात आल्या. यासाठी प्राप्त झालेला शेकडो कोटींचा निधी अधिकारी व कंत्राटदारांनी संगनमताने निकृष्ट कामे करून गिळंकृत केल्याने वर्षानुवर्षे महिलांच्या डोक्यावरील असलेला हंडा उतरण्यास तयार नाही. त्यात आता जलजीवन योजनेची भर पडते की काय? अशी भीती आष्टी मतदारसंघातील ग्रामस्थांना भेडसावत असून मुदती संपूनदेखील आष्टी, पाटोदा व शिरूर कासार तालुक्यातील जलजीवनची कामे अर्धवट अवस्थेतच आहेत. कामे मुदतीत पूर्ण न केल्यामुळे नियमाप्रमाणे कंत्राटदारांवर १० टक्के दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी मनसे शेतकरी सेनेचे जिल्हाध्यक्ष कैलास दरेकर यांनी केली आहे.

याबाबत जिल्हाधिकारी यांच्यासह मुख्य कार्यकारी अधिकारी यांना निवेदन देण्यात आले असून त्यात म्हटले आहे की, जलजीवन मिशन अंतर्गत 'हर घर जल' ही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची महात्वाकांक्षी योजना आहे. आष्टी मतदारसंघातील आष्टी, पाटोदा व शिरूर कासार या तीन तालुक्यांतील गावांना कोट्यावधी रूपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. सततच्या दुष्काळी परिस्थितीने होरपळणार्या जनतेला विशेष करून महिला व वयोवृद्ध नागरिकांना या योजनेचा मोठा फायदा होणार आहे.

जलजीवन मिशन योजनेअंतर्गत आष्टी तालुक्यातील १७२ गावे, पाटोदा तालुक्यातील ९० गावे व शिरूर तालुक्यातीलही अनेक गावांत ही योजना राबविण्यासाठी निविदा प्रक्रिया पार पडून प्रत्यक्ष कामांना सुरवातही धुमधडाक्यात करण्यात आली आहे. मात्र, कंत्राटदार व अधिकार्यांच्या अभद्र युतीमुळे इतर राबविण्यात आलेल्या योजनांप्रमाणे या योजनेतही मोठ्या प्रमाणावर गैरप्रकार करण्यात आले आहेत. गेल्या चार वर्षांपासून जवळपास सर्वच योजना अर्धवट अवस्थेत ठेवून मागील योजनांप्रमाणे या योजनेतही भ्रष्टाचार करण्याचे मनसुबे कंत्राटदार व अधिकार्यांकडून बाळगले जात आहेत.

आष्टी तालुक्यातील १७२ पैकी ४४ कामे तसेच पाटोदा तालुक्यातील ९० पैकी २७ कामे भौतिकदृष्ट्या पूर्ण झाली व पाटोदा तालुक्यातील ५ कामांची यशस्वी चाचणी घेण्यात आली असल्याचे दाखविण्यात आले आहे. मात्र, अद्यापपावेतो कोणत्याही गावाला या योजनेमार्फत पाणीपुरवठा सुरू करण्यात आलेला नसल्याने ग्रामस्थांसाठी कोट्यावधी रूपयांची ही जलजीवन योजना मृगजळच ठरली असल्याचे दिसून येत आहे. आष्टी मतदारसंघातील सर्वच कामांमध्ये निविदा प्रकिया राबविण्यापासून मोठ्या प्रमाणावर गोलमाल करण्यात आलेला आहे. एकाच कंत्राटदारांना २० ते २५ कामे देण्याचा महाप्रताप करण्यात आलेला आहे. अद्यापपावेतो ही योजनाही कागदोपत्रीच सुरू असून याचा नागरिकांना कोणताही लाभ झालेला नाही. त्यामुळे कार्यारंभ आदेशामध्ये कंत्राटदारांना घालून देण्यात आलेल्या अटी व शर्तींप्रमाणे कंत्राटदारांवर १० टक्के दंडात्मक कारवाई करण्यात येणे गरजेचे व आवश्यक आहे.

कंत्राटदारांवर दंडात्मक कारवाई करून त्यांना सहाय्य करणार्या अधिकार्यांवरही फौजदारी स्वरुपाचे गुन्हे दाखल करावेत. तसेच ही कामे आगामी सहा महिन्यांच्या कालावधीत पूर्ण करून ग्रामस्थांची पाण्यासाठी सुरू असलेली पायपीट कमी करण्यात यावी अन्यथा महाराष्ट्र नवनिर्माण शेतकरी सेनेतर्फे तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही कैलास दरेकर यांनी निवेदनात दिला आहे.

### भारत निर्माण, स्वजलधारासारख्या योजना ठरल्या चराईचे कुरण

आष्टी मतदारसंघात भारत निर्माण योजना, स्वजलधारा योजना, जलस्वराज्य, राष्ट्रीय पेयजल योजना, मुख्यमंत्री पेयजल, योजना, प्रधानमंत्री पेयजल योजना यासारख्या विविध योजनांवर शेकडो कोटींचा निधी खर्च होऊनही अधिकारी व कंत्राटदारांच्या संगनमताने निकृष्ट कामांमुळे वर्षानुवर्षे डोक्यावर असलेला हंडा उतरला नाही. त्यात आता जलजीवन योजनेची भर पडतेय की काय अशी भीती मतदारसंघातील जनतेला आहे.

### चार वर्षांपासून कामे सुरूच मुदतवाढीसाठी आर्थिक उलाढाल?

कार्यारंभ आदेशानंतर चार वर्षांचा कालावधी लोटूनही अद्याप या योजनेमार्फत सुरू असलेली कामे पूर्णत्वास गेलेली नसून मुदतवाढीचे प्रस्ताव थातूरमातूर कारणे दाखवून मोठ्या आर्थिक उलाढालीतून मंजूर करण्यात आलेले आहेत अथवा तशा हालचाली सुरू आहेत, असा आरोपही कैलास दरेकर यांनी निवेदनात केला आहे.

## बीड शहरातील नाली आणि नाला पहिल्याच अवकाळी पावसामुळे तुडुंब

### अंधारे मॅडम उघडा डोळ्याने बघा नीट : नवनाथ शिराळे पाटील

### भरून लोकांच्या घरात व हॉटेलमध्ये घुसले पाणी

बीड । प्रतिनिधी



सोमवारी दुपारी साडेतीन व चारच्या दरम्यान अचानक वाऱ्यासह वादळासह बीड शहरामध्ये अचानक अवकाळी पाऊस आल्यामुळे बीड शहरातील दळणवळण विस्कळीत झाले व पडलेल्या पावसाचे पाणी येथे असलेल्या नाल्या आणि नाला यामध्ये घाण साचल्यामुळे पाणी जाणार कुठे तर लोकांच्या घरात आणि लोकांच्या हॉटेलमध्ये घुसले तसेच बार्शी रोडवरील जय महाराष्ट्र हॉटेलमध्ये तर या नाला व नालीच्या घाण पाण्याचा खूप मोठा ढवच साचला होता याचे हे चित्र ही सोमवारी बीड शहरातील नागरिकांनी प्रत्यक्षात पाहिले आहे. यामुळे अनेक व्यापाऱ्यांना नागरिकांना या घाण पाण्याचा त्रास सहन करावा लागला हा त्रास आता कुठपर्यंत सहन करायचा अशी चर्चा देखील बीड शहरातील नागरिक तमाम बीड शहरवासीय नागरिक करत आहेत अजून तर पावसाळा ही सुरू झाला नाही हा अवकाळी पाऊस आहे.

या अवकाळी पावसात जर अशा नाली आणि नाला भरून लोकांच्या घरात पाणी जात असेल तर बीड नगरपालिकेचा आदर्श काय घ्यायचा हा ही प्रश्न बीड शहरातील तमाम नागरिकांना पडला आहे स्वच्छते कडून सुंदर ते कडे जाण्याचा हाच मार्ग आहे का हे एकदा बीडच्या नगरपालिकेच्या सीईओ नीता अंधारे मॅडम यांनी स्वतःचे आत्मपरीक्षण करून पहावे आणि बीड करांना या घाणीच्या साम्राज्यापासून व या नाला आणि नाल्या मध्ये साचलेल्या कचरा नगर प्रशासनाच्या माध्यमातून कचरा स्वच्छ व साप नाल्या नाला करून या होणाऱ्या त्रासातून सुटका करावी आणि नगर प्रशासनाच्या माध्यमातून कर्मचाऱ्यांच्या बीड शहरातील सर्व नाली आणि नाला हे साफ करून घेण्यात यावे जेणेकरून भविष्यामध्ये लवकरच पाऊस जवळ येत आहे.

चार महिने पावसाचे कसे जायचे अशा जर नाल्या व नाला भरून लोकांच्या घरात पाणी जात असेल तर लोकांचे घरच वाहून जायला हॉटेल वाहून जायला वेळ देखील लागणार नाही असे सुसाट वेगाने पाणी लोकांच्या घरात शिरत आहे.

हा आज अंदाज बिडकर यांना आलेला आहे म्हणून बीड नगरपालिकेच्या सीईओ नीता अंधारे मॅडम यांनी तात्काळ या महत्त्वाच्या बाबीकडे लक्ष देऊन बीड शहरातील स्वच्छता आणि सुंदरता याकडे आपला भर देऊन बीड शहरातील लोकांचे आरोग्य कसे उत्तम ठेवता येईल याकडे लक्ष द्यावे असे दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात भारतीय जनता पार्टी नेते तथा बीड नगरपालिकेचे माजी सभापती या नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांनी म्हटले आहे. नसता बिलकरांना रस्त्यावर उतरावे लागेल आणि आम्ही त्यांच्या सदैव सोबत ठामपणे उभा राहू असा विश्वास ही भाजपा नेते नवनाथ अण्णा शिरोळे पाटील यांनी सर्व बीड शहरातील नागरिकांना दिला आहे म्हणून आता या कडे नगर प्रशासन कोणत्या दृष्टीने पाहते आणि बिडकर यांना या घाणीच्या साम्राज्यातून सुटका करून व नाली वनाला साफ करून न्याय मिळवून देते का हे देखील पाहणे गरजेचे असणार आहे.

## तातडीने पंचनामे करण्याचे प्रशासनाला निर्देश

### वादळी-वारा, पावसाने झालेल्या नुकसानीची आ.संदीप क्षीरसागरांकडून पाहणी

बीड । प्रतिनिधी

वादळी-वारा व अवकाळी पावसाने झालेल्या नुकसानीची आ.संदीप क्षीरसागर यांनी प्रत्यक्ष पाहणी केली. तसेच झालेल्या नुकसानीचे तात्काळ पंचनामे करण्याचे निर्देश जिल्हा प्रशासनाला दिले आहेत.

सोमवारी (दि.१२) रोजी बीड मतदारसंघातील बीड शहर आणि ग्रामीण भागात अचानक वादळी वार्यासह मुसळधार पाऊस झाला. या पावसामुळे नागरिकांचे आणि शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. या अनुषंगाने बीड विधानसभा मतदारसंघाचे आमदार संदीप क्षीरसागर यांनी विविध नुकसानग्रस्त ठिकाणी तात्काळ जाऊन पाहणी केली. झालेल्या अवकाळी पाऊस आणि वादळी वार्यामुळे शेतीचे तसेच नागरिकांच्या घरांचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या नुकसानींचे तात्काळ पंचनामे करून नुकसानग्रस्तांना शासनस्तरावरून मदत करण्यासाठी कार्यवाही करण्यासाठी प्रशासनाला आ.क्षीरसागर यांनी निर्देश दिले आहेत.

**विद्युत व्यवस्था सुरळीत करण्याच्या सूचना**

अचानकपणे जोरदार वादळी वारे सुटल्याने विद्युत वितरणाची व्यवस्था विस्कळीत झाली. अनेक ठिकाणी विद्युत तारा तुटल्या तसेच विद्युत खांब पडले आहेत. त्यामुळे वीज पुरवठा खंडित झाला आहे. बीड शहर आणि ग्रामीण भागात तात्काळ वीजपुरवठा सुरळीत करण्याच्या सूचनाही आ.संदीप क्षीरसागर यांनी विद्युत विभागाला दिल्या आहेत.



## नेकनूर गावात मुस्लिम कब्रस्तानावर बुलडोझर : अन्वर हाशमी

### दलित-मुस्लिमांच्या पाठिंब्यावर निवडून आलेल्या सरपंचाचे वर्तन चर्चेत; राष्ट्रवादी काँग्रेसची सत्ता असलेल्या ग्रामपंचायतीत भाजपप्रणीत विचारसरणीचा प्रभाव?

नेकनूर । प्रतिनिधी

गावातील मुस्लिम कब्रस्तानावर सरपंच लांडगे यांच्या आदेशानुसार बुलडोझर चालवण्यात आल्याने गावात तीव्र संतापाची लाट उसळली आहे. मुस्लिम समाजाच्या धार्मिक भावना दुखावल्या गेल्या असून, ग्रामपंचायत हद्दीत अशा प्रकारची कारवाई कोणत्याही पूर्वसूचनेशिवाय करण्यात आल्याचा आरोप करण्यात येत आहे.

विशेष म्हणजे, सरपंच लांडगे हे दलित व मुस्लिम समाजाच्या मतांवर निवडून आले असूनही, त्यांनी भाजपप्रणीत विचारांप्रमाणे कार्यवाही केल्याचा आरोप स्थानिक कार्यकर्ते करत आहेत. ग्रामपंचायतीवर राष्ट्रवादी काँग्रेसची सत्ता असून, या पक्षाने केंद्रात भाजपसोबत युती केली आहे. त्यामुळे भाजपचा स्थानिक निर्णयप्रणालीवर प्रभाव जाणवू लागल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

मुस्लिम कब्रस्तान वक्फ बोर्डच्या अखत्यारीत असून संबंधित मुद्दा सध्या न्यायप्रविष्ट आहे. न्यायालयीन निर्णय न लागता सरळ कबरी समतल केल्या गेल्याने मुस्लिम समाजात असंतोष आहे. कब्रस्तानातल्या जुन्या कबरीवर बुलडोझर चालवला गेला, हे आमच्या धर्मावरील थेट आक्रमण आहे, अशी संतप्त प्रतिक्रिया स्थानिकांनी दिली. या पार्श्वभूमीवर कुल हिंद मजलिसे इत्तहादुल मुस्लिमीनचे नेते अन्वर हाश्मी यांनी संताप व्यक्त करत म्हटले, जर हे कुणाच्या सांगण्यावरून, पुण्याहून बसून ठरवले असेल, तर त्यालाही वेळ आली आहे की जनतेनं जागा दाखववी. आम्ही वक्फ संपत्ती आणि कब्रस्तानाच्या रक्षणासाठी रस्त्यावर उतरू. एमआयएम शेवटच्या श्वासापर्यंत हा लढा लढेल!



## चौसाळा बसस्थानकाचे काम निकृष्ट दर्जाचे

बीड । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील चौसाळा येथील बसस्थानकाचे काम सद परिस्थितीत सुरू असून सदरील कामामध्ये सिमेंटचा वापर हा अत्यल्प कमी झालेला पहावयास मिळत असून बुडालाच जर सिमेंट कमी असेल तर भविष्यात या कामाचा दर्जा कशा प्रकारचा असेल अशी भीती सर्वसामान्य नागरिक बाळगताना दिसत आहेत.

**जिल्हाधिकारी साहेब कामाची गुणवत्ता तपासा**

सदरील कामाची गुणवत्ता तपासण्यात यावी पुढील कामाला सुरुवात करण्यात यावी या ठिकाणी बांधकाम सुरू होण्या अगोदर जुन्या बस स्थानकाचे साहित्य हे देखील दिसून येत नाही. या कामामध्ये वाळूचा वापर कुठेही करण्यात आलेला नाही. वाळू ऐवेजी या ठिकाणी ढसचा वापर करण्यात आलेला पहावयास मिळत आहे. बीड जिल्ह्याचे कर्तव्यदक्ष जिल्हाधिकारी यांनी सदरील कामावरती विशेष लक्ष देऊन शासकीय कमिटी नेमून सदरील कामाची गुणवत्ता तपासावी व्यक्त होताना पाहावायास मिळत आहे.



### सोमवारी व मंगळवारी बीडला ऑरेंज अलर्ट आहे : काळजी घ्या : जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन

## नैसर्गिक आपत्तीसाठी तालुका प्रशासन सज्ज : तहसीलदार शेळके

बीड । प्रतिनिधी

सध्या राज्यात अनेक ठिकाणी विजा चमकणे, पाऊस यामुळे नैसर्गिक आपत्ती येण्याची शक्यता आहे. बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी नागरिकांना विजा पडत असताना स्वतःची काळजी घ्या असे आवाहन केले आहे. आकस्मिक पावसामुळे अनेकदा नाले, ओढे यांना अचानक पूर येऊ शकतो. त्यामुळे स्वतःची तसेच गुराढोरांची काळजी घेण्याचे आवाहन केले आहे. अचानक आलेल्या पावसामुळे आणि सोबतच विजा कडाडत असल्यामुळे नागरिकांची भंबेरी उडते. अशावेळी स्वतःची आणि पशुसंपदेची कशाप्रकारे काळजी घ्यावी याबद्दल प्रशासनाने सविस्तर माहिती दिली आहे. बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी कळविल्यानुसार वीजा पडताना सुरक्षित राहण्यासाठी, बाहेर असाल तर सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्या. झाडाखाली किंवा उंच ठिकाणी थांबणे टाळा. घरात असाल तर खिडक्या आणि दारांपासून दूर राहा, आणि पाणी किंवा विद्युत उपकरणांपासूनही दूर रहा असे आवाहन केले आहे.

विजेच्या धोक्यापासून बचाव करण्यासाठी खालील गोष्टींची काळजी घ्या. बाहेर असल्यास, विजा चमकत असल्यास लगेच सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्या. बंद इमारत, घर किंवा बंदिस्त जागा यांसारखी ठिकाणे सुरक्षित मानली जातात. यावेळी उंच ठिकाणी थांबणे टाळा. उंच ठिकाणी, जसे की झाड, विद्युत पोल किंवा पत्र्याचे शेड, येथे थांबणे टाळा.





धातूच्या वस्तूंपासून दूर राहा : छत्री, चाकू किंवा भांडे यांसारख्या धातूच्या वस्तूंपासून दूर राहा. गटात उभे राहणे टाळा. इतर लोकांपासून योग्य अंतर ठेवा आणि गटात उभे राहणे टाळा. पायाव्यतिरिक्त इतर भाग जमिनीला स्पर्श होणार नाही याची काळजी घ्या. शेतात आश्रय घेतल्यास, पायाखाली कोरडे लाकूड, प्लास्टिक किंवा इतर साहित्य ठेवा, जेणेकरून शरीराचा कोणताही भाग जमिनीला स्पर्श करणार नाही. घरात असल्यास खिडक्या आणि दारांपासून दूर रहा. खिडक्या आणि दारांपासून दूर रहा. पाण्याशी संबंधित काम करू नका. सिंक, बाथटब किंवा नळाजवळ काम करणे टाळा. विद्युत उपकरणे सुरु करू नका. फोन, संगणक किंवा इतर विद्युत उपकरणे सुरु करू नका. विजा चमकत असताना मोबाईल फोन आणि इंटरनेटचा वापर टाळा. वादळात एसी चालू ठेवणे टाळा. शेतामध्ये सुरक्षित ठिकाण (उदा. शेड, कँप) शोधा. झाडाखाली उभे राहणे टाळा. तारेचे कुंपण विजेला आकर्षित करते, त्यामुळे ते टाळा. पायाखाली कोरडे साहित्य ठेवा उदा. कोरडे लाकूड, प्लास्टिक किंवा इतर साहित्य पायाखाली ठेवा. बीडचे निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी कळविल्यानुसार पावसाळ्यात हवामान विभागामार्फत विविध अलर्ट दिले जातात. त्यांचा नेमका अर्थ काय तो खालील प्रमाणे आहे.

रेड अलर्ट म्हणजे काय ? : जेव्हा एखाद्या भागात अतिमुसळधार किंवा अतिवृष्टीचा अंदाज असतो अशा वेळी रेड अलर्ट जारी करण्यात येतो. रेड अलर्ट म्हणजे मोठ्या संकटाची शक्यता. त्यामुळे नागरिकांनी शक्यतो घरी राहण्याच्या सूचना दिल्या जातात.

ऑरेंज अलर्ट म्हणजे काय ? : हवामान खात्याकडून मुसळधार पाऊस असेल अशा ठिकाणी ऑरेंज अलर्ट दिला जातो. याचा अर्थ असा की, अशा भागांमध्ये कोणत्याही क्षणी नैसर्गिक आपत्ती येण्याची शक्यता असते. इतकच नाहीतर ऑरेंज अलर्ट असेल तेव्हा नागरिकांनाही अवश्यक कामांसाठीच घराबाहेर पडण्याच्या सूचना दिल्या जातात. कारण, यावेळी अनेक समस्या येऊ शकतात.

यलो अलर्ट म्हणजे काय : हवामान खात्याकडून अनेक शहरांना यलोअलर्ट दिला जातो. याचा अर्थ असा होतो की, संबंधित शहरांमध्ये नैसर्गिक संकटाची शक्यता आहे. यामुळे नागरिकांच्या जनजीवनावरही परिणाम होऊ शकतो. त्यामुळे सगळ्यांना सावधगिरी बाळगण्याच्या सूचना दिल्या जातात.

ग्रीन अलर्ट अलर्ट म्हणजे काय ? : पावसाळ्यात अनेक भागांमध्ये ग्रीन अलर्ट असतो. याचा अर्थ की, संबंधित शहरांमध्ये पावसाची परीस्थिती सामान्य असेल. यावेळी कुठलेही निर्बंध घालण्याची गरज नसते. जीवन अनमोल आहे. त्यामुळे नागरिकांनी सुद्धा स्थानिक परिस्थिती बघून, वातावरण पाहून आपापली व पशुसंपदेची काळजी घेणे आवश्यक आहे. प्रशासन त्यांच्या परीने आवाहन करीतच असते. तथापि नागरिकांनी जीविताची काळजी घेणे आवश्यक आहे. निसर्गाचे चक्र बिघडले आहे. त्यानुसार काळजी घेणे आवश्यक आहे.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT